**प्रतिवादी तर्फे सा. क्र. ३ चा अतिरिक्त सरतपास – श्री. डी. डी. आजगेकर वकील.**

**३.** मला साक्ष देण्यासाठी न्यायालयाचे समन्स मिळालेले आहे. मला साक्ष देण्यासाठी बोलावलेला मूळ दस्त दाखवल्यास मी ओळखू शकतो. आता मला दि.२५.०५.१९९६ रोजीचा सदर करारनामा दाखवला, तो माझ्या हस्ताक्षरात लिहिलेला असून मी त्यावरती दस्तूर म्हणून स्वाक्षरी केलेली आहे. त्याला **नि.क्र.९४** देण्यात येतो. (वादीतर्फे सदर दस्तास अपूरा मुद्रांक शुल्क लावण्यात आलेला असून तो नोंदणीकृत नसल्यामुळे निशाणी क्रमांक देण्यास आक्षेप घेण्यात आलेला आहे. सदर साक्षीदार हा दस्तलेखक असून त्याने तो लिहिल्याचे कबूल केल्यामुळे वादींचा आक्षेप नाकारण्यात येऊन निशाणी क्रमांक देण्यात आलेला आहे.)

**सरतपास पुर्ण.**

**वादीतर्फे उलटतपास श्री. एस. एस. निकम वकील.**

**४.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील मजकूर वकिलांनी त्यांच्या ईच्छेप्रमाणे लिहिलेला आहे. मी वकिलांना मल्लीकार्जुन आणि वीरभद्र यांच्यामध्ये दि. २६.०५.१९९६ रोजी करारनामा लिहिल्याचे सांगितले नाही. करारनाम्यात लिहिलेला पाण्याच्या व सामाईक भिंतीच्या हक्काबाबतचे मूल्यांकन १००/- रुपयांपेक्षा जास्तीचे आहे.

**५.** मी करारनाम्यातील पक्षकारांना सदर दस्त नोंदणीकृत करुन घेण्याबाबतचा सल्ला दिला नव्हता. मी करारनामा केला त्यावेळी १००/- रुपये आणि त्यापेक्षा जास्त रकमेचा करारनामा नोंदणीकृत करण्याची आवश्यकता नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे दस्तलेखनाचा परवाना नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मला दस्त लिहून बरेच वर्षे झाल्यामुळे त्यात काय मजकूर लिहिला आहे ते आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारनाम्यातील संपुर्ण मजकूर केवळ मल्लीकार्जुन यानेच सांगितलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मल्लीकार्जुनच्या सांगण्या प्रमाणे चुकीचा दस्त लिहिला आहे.

**उलट तपास पुर्ण. फेरतपास नाही.** **श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २१.१२.२०२४. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.